**अतितात्काळ/कालमर्यादा**

क्र.पोमसं/३१/ घबांअ-ऑनलाईन /ॲक्सेस बँक /१७९/२०२४

मुंबई,दि. २१/१०/२०२४

संदर्भ:- परिपत्रक क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ-ऑनलाईन प्रणाली/९०/२०१८, दि.१७/०५/२०१८

विषय :- राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/अंमलदार यांना घरबांधणीसाठी बँका/वित्तीय संस्थामार्फत कर्ज व्यवस्था करण्याबाबत

******

उपरोक्त विषयाबाबत शासन निर्णय गृह विभाग बीयुडी क्र.-०९२२/प्र.क्र.१९६/आस्था-१, दि.१४/१०/२०२२ अन्वये राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/अंमलदार यांना घरबांधणीसाठी बँकामार्फत कर्जव्यवस्था करण्याबाबत दि.१०/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु केलेली योजना पुन्हा सुरु करण्यास मान्यता दिली आहे.

त्याअनुषंगाने ज्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे अर्ज सॉफ्टवेअरमध्ये भरण्यात आले आहेत. परंतु त्यांना अद्याप घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात आले नाही. त्यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करुन वितरीत करण्याकरीता संबंधीत घटक कार्यालयाची घरबांधणी अग्रिमाच्या ॲक्सेस बँकेची माहिती आवश्यक आहे. घरबांधणी अग्रिमाची रक्कम संबंधीत पोलीस अधिकारी/अंमलदार यांना वितरीत करण्याकरीता तसेच त्यांच्या हप्त्याची रक्कम या कार्यालयाच्या बँक खात्यावर पाठविण्याकरीता ॲक्सेस बँकेच्या PayPro या ऑनलाईन प्रणालीचा वापर करण्याबाबत या कार्यालयाचे परिपत्रक दि.१७/०५/२०१८ अन्वये सर्व घटक कार्यालयास कळविण्यात आलेले आहे.सोबत प्रत जोडली आहे. त्यामुळे **घरबांधणी अग्रिम वितरीत करणेकरीता तसेच हप्त्याची रक्कम भरणा करणेकरीता सर्व घटक कार्यालयाने ॲक्सेस बँकेच्या PayPro या ऑनलाईन प्रणालीचाच वापर करावा.**

तरी, खालील नमूद घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या कार्यालयाच्या घरबांधणी अग्रिमाच्या ॲक्सेस बँकेची माहिती खालील प्रमाणे **इंग्रजीमध्ये दि.२५/१०/२०२४ पर्यंत न चूकता** सादर करावी, ही विनंती.

| Axis bank Account No | IFSC Code | Account Name | Barnch Name | Emial Id |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**टिप:- सोबत घरबांधणी अग्रिमाच्या Axis Bank च्या खात्याच्या Cancel चेकची छायांकित प्रत जोडावी.**

(डॉ. आरती सिंह )
विशेष पोलीस महानिरीक्षक(प्रशासन)
पोलीस महासंचालक,म.राज्य, मुंबई यांचे कार्यालय

प्रति,

महासंचालक, दहशतवाद विरोध पथक महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

पोलीस आयुक्त, पुणे शहर/ अमरावती शहर/औरंगाबाद शहर/ नागपूर शहर/ नाशिक शहर/ नवी मुंबई/सोलापूर शहर/
ठाणे शहर/ मिरा-भाईंदर-वसई-विरार /लोहमार्ग, मुंबई/ पिंपरी चिंचवड

अपर पोलीस महासंचालक, फोर्सवन मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग,पुणे

विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, मुंबई

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग पुणे/ दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणे/ पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण/
पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण

पोलीस अधीक्षक, अकोला/ अमरावती ग्रा./ औरंगाबाद ग्रा./बीड/ बुलडाणा/धुळे/गडचिरोली/ गोंदिया/ हिंगोली/ जळगांव/
जालना/ कोल्हापूर/ लातूर/ नागपूर ग्रा./ नांदेड/ नंदूरबार/ नाशिक ग्रा./ पालघर/ परभणी/ पुणे ग्रा./
लोहमार्ग, नागपूर/ लोहमार्ग, औरंगाबाद/सांगली/ सातारा/ सोलापूर ग्रा./ ठाणे ग्रा./ वाशिम/ यवतमाळ/
अहमदनगर/चंद्रपूर/ सिंधुदुर्ग/भंडारा/ रायगड/रत्नागिरी/

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, नागपूर

प्रचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे, बाभळगांव लातूर/ जालना/खंडाळा/रा.रा.पो.बल नानवीज, दौंड/नागपूर/अ.अ.प्र.के.,नागपूर/
UCTC- मुंबई

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१/२/३/४/५/६/७/८/९/१०/११/१२/१३/१४/१५/१६/ १९

समादेशक, राज्य अपत्ती प्रतीसाद दल, धुळे/ नागपूर

पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, कोल्हापूर/ नाशिक

अपर उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, अमरावती/ औरंगाबाद/ नागपूर/नांदेड

क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ-ऑनलाईन प्रणाली/९०/२०१८ मुंबई, दि.१७/०५/२०१८

संदर्भ :- १) या कार्यालयाचे परिपत्रकीय आदेश क्र. पोमसं/३१/शासकीय अग्रीम/१८५/२०१६, दि. ०१/०२/२०१७
२) या कार्यालयाचे ज्ञापन क्र. पोमसं/३१/३९-१/घबांअ-बँक कर्ज/३८/२०१७, दि. ०७/०७/२०१७
३) या कार्यालयाचे परिपत्रकीय आदेश क्र. पोमसं/३१/३९-१/घबांअ/१७/२०१८, दि. ०७/०४/२०१८
आणि
४) या कार्यालयाचे समक्रमांकीत ज्ञापन दि. १२/०४/२०१८

विषय :- **राज्यातील पोलीस दलातील कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिमाकरिता बँकामार्फत कर्ज व्यवस्था करण्याबाबत**

*****

परिपत्रक :-

उपरोक्त विषयास अनुसरुन घटक कार्यालयांकडून घरबांधणी अग्रिमाबाबतची माहिती या कार्यालयास ऑनलाईन सादर केल्यानंतर व या कार्यालयाकडून मान्यता मिळाल्यानंतर ती माहिती पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांच्याकडे कर्जाच्या मागणीकरिता पाठविली जाते. महामंडळाकडून ती माहिती एचडीएफसी या वित्तीय संस्थेला सादर केली जाते. अंतिमत: केलेल्या मागणीप्रमाणे एचडीएफसी या वित्तीय संस्थेकडून कर्ज रुपाने रक्कम महामंडळाच्या बँकेत जमा होते.. महामंडळाकडून ती रक्कम या कार्यालयाच्या ॲक्सीस बँकेच्या खात्यामध्ये जमा झाल्यानंतर सदरची रक्कम या कार्यालयाकडून संबंधीत घटक कार्यालयांना, वितरीत करण्यासाठी अदा केली जाते. सदर रक्कम अर्जदारास (पोलीस अधिकारी/कर्मचारी) अदा करण्यासाठी आणि केल्यानंतर सर्व घटक प्रमुखांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे पुन्हा सूचना देण्यात येत आहेत:-

१. सर्व घटक प्रमुखांनी त्यांच्या ॲक्सीस बँकेत घरबांधणी अग्रिमाची जमा झालेली रक्कम पुन्हा इतर बँकेत बदली (transfer) न करता, ती रक्कम संबंधीतांच्या (Beneficiary) बँकेच्या खात्यामध्ये जमा करावी.

२. सर्व घटक प्रमुखांनी अग्रिमधारकास रक्कम वितरीत करण्यासाठी ॲक्सीस बँकेच्या Paypro या ऑनलाईन प्रणालीचाच वापर करावा. Paypro ची सुविधा कार्यालयास उपलब्ध नसल्यास ॲक्सीस बँकेच्या संबंधीत शाखेशी तात्काळ संपर्क साधून सदर सुविधा उपलब्ध करुन घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. तोपर्यंत RTGS किंवा NEFT व्दारा रक्कम अर्जदाराच्या खाती जमा करावी. हा व्यवहार PayPro मार्फत केल्याने जमा केलेली रक्कम, शिल्लक रक्कम इ. चा अहवाल ऑनलाईन मिळण्यास सोपे जाईल.

३. घरबांधणी अग्रिमाची रक्कम घटक कार्यालयाच्या खात्यावर जमा झाल्यास, ती रक्कम Cheque व्दारे किंवा रोखीने कोणत्याही परिस्थितीत संबंधीत कर्मचाऱ्यास अदा करुन नये. घटक कार्यालयाच्या ॲक्सीस बँकेतील खात्यावर जमा झालेली रक्कम अग्रिम धारकास अदा केल्यानंतर, सदर व्यवहाराचा UTR Number MSPHC या ऑनलाईन प्रणालीमध्ये न चूकता त्याच वेळी भरावा.

४. बँकेच्या व्यवहाराकरिता घटक कार्यालयांनी त्यांच्या कार्यालयातील दोन अधिकाऱ्यांना स्वाक्षरीचे प्राधिकार प्रदान करावेत. जेणेकरुन एका अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीमुळे व्यवहार प्रलंबित राहणार नाहीत.

५. घरबांधणी अग्रीमाची रक्कम वितरीत केल्यानंतर त्या महिन्याच्या लगतच्या महिन्यापासून मुद्दलाची वसुली करण्यात यावी. उदा. मे. २०१८ मध्ये अर्जदारास अग्रीम वितरीत केल्यानंतर माहे जून २०१८ च्या वेतनातून मुद्दलाची वसुली करावी. ती रक्कम ५ जुलै पर्यंत पोलीस महासंचालक कार्यालयाच्या ॲक्सीस बँकेच्या खात्यामध्ये ऑनलाईन जमा करावी.

६. अर्जदारास रक्कम वितरीत केल्यानंतर मुद्दलाची वसुली केलेली रक्कम पोलीस महासंचालक कार्यालयाच्या ॲक्सीस बँकेच्या खात्यामध्ये ऑनलाईन जमा केल्यानंतर त्याची नोंद MSPHC मोडयुलमध्ये न विसरता त्याच वेळी घ्यावी. याबाबत रोखपाल आणि MSPHC मोड्यूलमध्ये माहिती भरणारे (inputter) यांनी समन्वय राखावा. तसेच, या कार्यालयास त्याबाबतची सविस्तर यादी ई-मेलव्दारे /फॅक्स व्दारे पाठवावी. यापूर्वी अशा प्रकारच्या केलेल्या व्यवहारांची माहिती सादर केली नसल्याने तीही तात्काळ सादर करावी.

७. असेही निर्दशनास आले आहे की, MSPHC मोड्यूलमध्ये अर्जदाराची घरबांधणी अग्रिमाबाबतची माहिती भरताना, त्याचे नांव, पदनाम तसेच, आवश्यक महितीची मोड्यूलबरोबर पडताळणी न केल्याने चूकीच्यापध्दतीने भरली गेली आहे. काही कार्यालयांनी अर्जदाराच्या अर्जामध्ये नमूद माहिती मोड्यूलमध्ये भरल्यानंतर कार्यालयांच्या खात्यामध्ये अग्रिमाची रक्कम जमा झाल्यानंतर कागदपत्रांची पडताळणी करण्याची सुरुवात केली आहे. या त्रुटी / उणिवा / चूका यापुढे टाळाव्यात. घटक प्रमुखांना पडताळणी करुन ऑनलाईन अर्ज या कार्यालयास पाठविण्यासाठी inputter ID व password दिलेला आहे. त्यामुळे चूकीची माहिती पाठविण्यास संबंधीत लिपिक आणि कार्यालय अधीक्षकांबरोबरच घटक प्रमुखदेखील जबाबदार राहतील.

२. तरी, वरील सूचना क्र. २ बाबतची कार्यवाही त्वरेने पूर्ण करणे अत्यावश्यक असल्याने प्रत्येक घटक कार्यालयांनी ॲक्सीस बँकेच्या स्थानिक शाखेशी संपर्क साधून वरील कार्यवाही पूर्ण करुन पूर्तता अहवाल ८ दिवसांत ई-मेल व्दारे या कार्यालयास सादर करावा. स्थानिक बँकेच्या शाखेच्या अधिकाऱ्यांकडून सहकार्य मिळत नसल्यास पोलीस उपअधीक्षक / सहा. पोलीस आयुक्त / सहायक समादेशक दर्जाच्या अधिकाऱ्यांनी (समन्वयक अधिकारी (Nodal Officer)) मुंबई येथील ॲक्सीस बँकेच्या खालील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा :-

| अधिकाऱ्याचे नाव | मोबाईल क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|
| श्री. समीर परब, ॲक्सीस बँक | ९१६७००१२४१ | Dadar.branchhead@axisbank.com |
| श्री. योगेश नाईक, ॲक्सीस बँक | ९८९२०४६८६९ | yogesh.naik@axisbank.com |

या कार्यालयाचा ई-मेल आयडी :- desk31.dgoffice@mahapolice.gov.in

३. वरील प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत घटक प्रमुखांनी संबंधीत प्रशासकीय अधिकारी, कार्यालय अधीक्षक यांना सक्त सूचना द्याव्यात. यामध्ये कसल्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई/बिनतारी संदेश विभाग, पुणे/लोहमार्ग मुंबई/ रा.रा.पो.बल. मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे
सर्व पोलीस आयुक्त, (रेल्वेसह) (बृहन्मुंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, मुंबई/फोर्सवन मुंबई/ मोटार परिवहन पुणे/रा.रा.पो.बल नागपूर / पुणे
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्त प्रबोधिनी, पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये/अ.अ.प्र.कें, नागपूर
उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश विभाग, पशिचम विभाग-पूर्व विभाग, नागपूर / पुणे
उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई/नांदेड/नाशिक/पुणे/ठाणे/कोल्हापूर/नागपूर
पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, नवी मुंबई/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती